**आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून पनवेल तालुक्यातील गावांमध्ये विविध विकासकामे करण्यात येत आहेत. या अंतर्गत रोडपाली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील हायमास्ट दिवे, गणेश विसर्जन घाट आणि गार्डनचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले...**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकासनिधीमधून पनवेल तालुक्यातील गावांमध्ये विविध विकासकामे करण्यात येत आहेत. रोडपाली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील हायमास्ट दिवे, गणेश विसर्जन घाट आणि माता रमाई उद्यान कंपाऊंड ही कामे करण्यात आली आहेत. या कामांचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील, कळंबोली अध्यक्ष बुधाजी ठाकूर, माजी सरपंच अरुण पाटील, अमर पाटील, सुभाष गायकवाड, जीवन गायकवाड, मारुती गायकवाड, संजय गायकवाड, नरेश जाधव, जहेर पटेल, श्रीकांत ठाकूर, आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर ग्रामस्थ, शाक्य संघ मित्र मंडळ व माता रमाई महिला मंडळ यांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर व उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला

सिडकोतर्फे होणारा विकास हा केवळ वसाहतीपुरता न राहता गावांपर्यंत पोहचला पाहिजे यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला आता यश येत असल्याचे सांगून आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यकर्ता म्हणून समाधान वाटत असल्याचे प्रतिपादन केले. गावाच्या विकासामध्ये सहभाग घेऊन शासनाच्या विविध विकास योजना आणण्याची जबाबदारी तरुण कार्यकर्त्यांवर आहे. त्यासाठी आपण सजग रहा असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. तसेच कोणत्याही समस्या असल्यास त्या सोडविण्यासाठी आपण नेहमीच सोबत आहोत अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामस्थांना दिली.

रोडपाली विभागातील विविध विकासकामे आणि कळंबोली येथे उभारण्यात येणार असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन या कामांचे श्रेय आमदार प्रशांत ठाकूर यांना जात असल्याचे जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील यांनी स्पष्ट केले.